डोणगाव मध्ये अवैध धंदे कुणाच्या आशीर्वादाने? >>पान 2

चांदवड तालुक्यातील निमोण येथे दिवसा घरफोडी करुन चोरी करणाऱ्या संशयीतास पोलीसांकडून मुद्देमालासह अटक >>पान 3

जिल्ह्यात सुशासन सप्ताह राबविण्यात येणार >>पान 4

**सुविचार**
संकटांमध्येही संधी शोधा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 122 ■ शुक्रवार, दि. 13 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




सर्वात जलद १००० कोटी, 'पुष्पाभाऊ'समोर सर्व फेल!
आतील पान

# जागतिक, प्रादेशिक ट्रेंडशी सुसंगत गुंतवणूक धोरण तयार करण्यावर भर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी राज्य शासनाचे विविध उपक्रम

### गुंतवणूकदारांना मदतीसाठी कंट्री डेस्क विशेष कक्ष

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : देश विदेशातील गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणुकीकरिता आकर्षित करण्यासाठी राज्य शासनामार्फत आता विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. देशी-विदेशी गुंतवणुकीसाठी गुंतवणूकदारांच्या प्रस्तावांसाठी त्यांना सल्ला व मदत देण्यासाठी कंट्री डेस्क या विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. नवीन गुंतवणूकीसाठी जागतिक व प्रादेशिक गुंतवणूक व्यापारासह सुसंगत धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्य सरकार व प्रमुख उद्योग गटांमध्ये समन्वय वाढवण्याच्या दृष्टीने औद्योगिक समन्वय सुधारणा होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. महाराष्ट्रात प्राधान्याने गुंतवणूक व्हावी यासाठी संभाव्य गुंतवणूकदारांसोबत संवाद प्रस्थापित करण्यात येत आहे. याद्वारे गुंतवणुकीच्या दृष्टीने सातत्याने सहकार्य देण्यात येईल. आजपर्यंत झालेल्या सामंजस्य करारांची (चेणी) अंमलबजावणी जलद गतीने करण्यात येईल. त्याचबरोबर महाराष्ट्रातील गुंतवणूक संधींबाबत जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे.



याअंतर्गत बहुपक्षीय संस्थांशी आणि विकास बँकांशी सहकार्य वाढवणे, दूतावास व व्यापार संघटनांशी समन्वय वाढवणे, महाराष्ट्रातील मराठी प्रवासी समुदायाला गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणे आणि इलेक्ट्रॉनिक्स, कापड, ऑटोमोबाईल आणि औषधनिर्मिती अशा विविध क्षेत्रांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.

या नव्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री व उद्योग संचालनालय सक्रिय भूमिका बजावणार आहे.

### – ठळक मुद्दे –

- गुंतवणूकदारांना उद्योग प्रस्तावांमध्ये मदत करण्यासाठी कंट्री डेस्क विशेष कक्ष
- जागतिक आणि प्रादेशिक ट्रेंडशी सुसंगत नवीन गुंतवणूक धोरण
- शासन आणि प्रमुख औद्योगिक संस्थांमध्ये समन्वय वाढवणे
- गुंतवणुकीच्या प्रक्रियेत गुंतवणूकदारांना सतत आवश्यक सहाय्य देणे
- सामंजस्य करारांचा पाठपुरावा आणि अंमलबजावणीची गती सुधारणे
- राज्यातील गुंतवणुकीच्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे
- बहुपक्षीय संस्था आणि विकास बँकांसोबत काम करणे
- दूतावास आणि व्यापारी संघटनांसोबत समन्वय वाढवणे
- विशेषतः देशविदेशातील महाराष्ट्रीयन उद्योजक यांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित करणे
- इलेक्ट्रॉनिक्स, टेक्सटाईल, ऑटोमोबाईल्स, फार्मास्युटिकल्स यांसारख्या महत्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे

## एनआयएची भिवंडीसह अमरावतीत कारवाई, दोन संशयित तरुणांची चौकशी सुरु

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/अमरावती/प्रतिनिधी** : एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेच्या गुप्तचर यंत्रणेच्या पथकानं महाराष्ट्रासह देशभरातील पाच राज्यांमध्ये कारवाई केली आहे. एनआयएच्या पथकानं भिवंडी आणि अमरावती कारवाई करून दोन संशयित तरुणांना ताब्यात घेतलं आहे.

एनआयएच्या पथकानं स्थानिक पोलिसांच्या मदतीनं ठाणे जिल्हातील भिवंडी तालुक्यातील खोणी ग्रामपंचायतच्या हद्दीतून छापा मारला. यावेळी सापळा रचत संशयित तरुणाला आज पहाटेच्या सुमारास पथकानं ताब्यात घेतलं आहे. ककामरान अन्सारी असे एनआयएच्या पथकानं ताब्यात घेतलेल्या तरुणाचं नाव आहे. काही महिन्यापूर्वी भिवंडी तालुक्यातील पडघा – बोरिवली गावातून 'आयसिस' दहशतवादी संघटनेच्या ६ ते ७ जणांना अटक केली होती.




दुसरीकडं एनआयए पथकाकडून अमरावतीत एका युवकाची पाकिस्तानशी संबंध असल्याच्या प्रकरणात चौकशी सुरू आहे. एनआयएचं पथक शुक्रवारी पहाटेच अमरावतीत दाखल झालं.

पहाटे साडेतीन वाजता युवकाला अटक- पाकिस्तानशी संबंध असणाऱ्या देशभरात विविध ठिकाणी एनआयएच्या पथकानं धाडसत्र राबवून २४ ते २५ जणांना ताब्यात घेतलं असल्याची माहिती आहे. अमरावती शहरातील छाया नगर परिसरात राहणाऱ्या एका युवकालादेखील पाकिस्तानसोबत संबंध असल्याच्या माहितीवरून ताब्यात घेण्यात आलं. एनआयएचं पथक आणि राजापेठ पोलिसांच्या वतीनं संयुक्त कारवाईदरम्यान या युवकाला पहाटे साडेतीन वाजता ताब्यात घेण्यात आलं. छाया नगर परिसरातील ३५ वर्ष युवक गत काही दिवसांपासून पाकिस्तानमधील काही संघटनांसोबत सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात होता. या युवकाचा नेमका कोणत्या संघटनांशी संपर्क होता? या संदर्भात एनआयएचं पथक चौकशी करत आहे.

२०२२ मध्ये आलं होतं एनआयएचं पथक- यापूर्वी अमरावती शहरात एनआयएचं पथक २०२२ मध्ये महेश कोल्हेंच्या हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी आलं होतं. आता पुन्हा एकदा एनआयएचं पथक अमरावतीत दाखल झालं. चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलेल्या युवकाची बराच वेळेपासून चौकशी सुरू आहे. या प्रकरणात नेमकं काय तथ्य आहे? हे लवकरच स्पष्ट होईल, असं पोलिसांच्या वतीनं सांगण्यात आलं.

### गटनेता पदावरून काँग्रेसमध्ये रस्सीखेच, अद्याप काँग्रेसचा गटनेता निश्चित नाही

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : एकीकडे राज्यातील सत्तारुढ भाजपा महायुती सरकारच्या मंत्रिपदावरून अद्याप अनिश्चितता कायम असताना विरोधी पक्षातील काँग्रेसचा गटनेतादेखील जाहीर होऊ शकलेले नाहीत. महाविकास आघाडीतील प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसने अद्याप त्यांचा गटनेता निश्चित केला नाही. गटनेतेपदाची जबाबदारी काँग्रेसच्या कोणत्या आमदाराला मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाविकास आघाडीतील मित्र पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने भास्कर जाधव यांना, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने जितेंद्र आव्हाड यांना आपापल्या पक्षाचे गटनेते म्हणून नियुक्त केलंय. मात्र काँग्रेसला अद्यापही गटनेता निवडता आलेला नाही. मुख्यमंत्रिपदाचे नाव जाहीर करण्यास विलंब झाल्याने भाजपावर विरोधाचे आसूड ओढणाऱ्या महाविकास आघाडीतील काँग्रेसला गटनेता निवडीसाठी विलंब होत असल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झालीय. विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला अवघ्या १६ जागांवर समाधान मानावे लागले आहे.

## परभणीत रात्री पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन?

**दैनिक आपला विदर्भ**

**परभणी/प्रतिनिधी** :परभणीतील स्टेशन रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर असलेल्या संविधान प्रतिकृतीचा अवमान झाल्याच्या निषेधार्थ बुधवारी पुकारण्यात आलेल्या बंदला हिंसक वळण लागले. बंदचे आवाहन करत असंख्य युवक रस्त्यावर आल्यानंतर शहरातील मध्यवर्ती भागात तणाव निर्माण झाला. शहरातील काही दुकाने आणि वाहनांवर दगडफेकीच्या घटना घडल्या. संतप्त जमावाने एसटी बसवरही दगडफेक केली. दुपारी जिल्हाधिकाऱ्यांनी जमावबंदीचा आदेश दिल्यानंतर परिस्थिती निवळली. मात्र, रात्रीही पोलिसांकडून कोबिंग ऑपरेशन झाल्याचं म्हटलं जातंय. यावर पोलिसांनी खुलासा केला आहे.

''काल ही परिस्थिती नियंत्रणात आणताना पोलिसांनी काही लोकांची धरपकड केली होती. त्यात ५० लोकांना आम्ही अटक केली होती. त्यामुळे रात्री कोंबिंग ऑपरेशन करून कार्यकर्त्यांना अटक केली नाही. रात्री परिस्थित नियंत्रणात आणतानाच अटक केली होती. रात्री कोंबिंग ऑपरेशन झालं नाही'', असं स्पष्टीकरण आज पोलिसांनी माध्यमांना दिलं.

मंगळवारी सायंकाळी घडलेल्या अनुचित प्रकारानंतर बुधवारी आंबेडकरी संघटनांच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आले होते. बंददरम्यान अनेक दुकानांवर, वाहनांवर दगडफेक करण्यात आली. पोलीस आणि आंदोलकांमध्ये अनेक ठिकाणी संघर्ष झाल्याचे पाहायला मिळाले. बंदच्या पार्श्वभूमीवर एसटी परिवहन महामंडळाकडून परभणी आगारातून एकही बस सोडण्यात आली नव्हती. आजही पोलिसांच्या सूचनेनुसार परभणीत संचारबंदी लागू करण्यात आली असून तणावपूर्वक शांतता आहे.

आमदार-खासदारांकडून शांततेचे आवाहन

हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर शांतता राखण्याचे आवाहन खासदार संजय जाधव, आमदार राहुल पाटील यांनी केले आहे. संविधान प्रतिकृतीच्या अवमानाच्या घनटेचा दोघांनीही निषेध खेला असून आरोपीला अटक केल्यानंतर संपूर्ण प्रकरणाची कसून चौकशी करण्यात आयावी, असी मागणी केली आहे. आमदार पाटील यांनी समर्थक कार्यकर्त्यांसह शहराच्या वेगवेगळ्या भागांत फिरून शांततेचे आवाहन केले.

काय घडले परभणीत?

परभणीत संविधानाच्या प्रतिची विटंबना करण्यात आल्याची घटना मंगळवारी घडली. त्यानंतर परभणीत आज बंदची हाक देण्यात आली. या दरम्यान बंदला हिंसक वळण लागलं आहे. आंदोलनकांनी काही दुकानांवर दगडफेक केली आणि पोलिसांच्या काही गाड्यांवरही दगड फेकले. ज्यानंतर पोलीस ॲक्शन मोडवर आले आहेत. पोलिसांनीही या आंदोलकांवर सोम्य लाठीचार्ज केल्याचे पाहायला मिळाले असून शहरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### त्रयस्थ संस्थांकडे भंगार विल्हेवाट, निविदा प्रक्रियेअंती तीन संस्थांची नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई महानगरपालिकेने शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांतील लहान-मोठे, तसेच मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे अडथळामुक्त करण्याचा संकल्प केला असून अनेक महिन्यांपासून धूळखात उभी असलेली वाहने, अस्ताव्यस्त पडलेले विविध प्रकारचे भंगार साहित्य, बांधकाम सामग्री हटविण्यासाठी तीन संस्थांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

मुंबईमधील अनेक लहान-मोठ्या, तसेच मुख्य रस्त्यांच्या कडेला वाहने उभी करण्यात येतात. ही वाहने अनेक महिने 'जैसे थे'च असतात. त्यावर धूळ साचते आणि अनेक दिवस संबंधित वाहने एकाच जागी उभी असल्याचे लक्षात येते. कालांतराने ही वाहने वाहतूक आणि पादचाऱ्यांसाठी अडथळा बनतात. त्याचबरोबर पावसाळ्यात या वाहनांमध्ये डासांची उत्पत्ती स्थाने निर्माण होतात आणि डासांमुळे आसपासच्या परिसरात आजारांचा प्रादुर्भाव होतो. त्याचबरोबर अनेक वेळा धातू स्वरुपातील भंगार, अनधिकृत बांधकाम सामग्री (ताडकामकचरा वगळून) रस्त्यावरच फेकून दिले जाते. त्याचाही वाहतूक आणि पादचाऱ्यांना अडथळा होतो. आतापर्यंत रस्त्यावरील बेवारस अथवा एकाच ठिकाणी अनेक दिवस उभे केलेल्या, धूळ साचून खराब झालेल्या वाहनांवर महापालिकेच्या विभाग कार्यालयांच्या स्तरावर कारवाई करण्यात येत होती. या वाहनांवर नोटीस चिकटविण्यात येत होती. संबंधित वाहनमालक न आल्यास वाहन उचलून नेण्यात येत होते. मुंबईत व्यापक स्वरुपात ही कारवाई करून अनेक वाहने ताब्यात घेतली होती. परंतु ही वाहने ठेवण्यासाठी जागा अपुरी होती. आता विभाग पातळीवर ही कारवाई करण्याऐवजी शहर, पश्चिम उपनगर आणि पूर्व उपनगरांसाठी स्वतंत्र तीन संस्थांची नेमणूक करण्याचा निर्णय घेतला.

## मोठी बातमी! केंद्रीय मंत्रिमंडळाची 'एक देश, एक निवडणूक' विधेयकाला मंजुरी

**नवी दिल्ली** : देशात 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर आज (दि. १२ डिसेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.

एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत




अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास 'एक देश, एक निवडणूक' धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे. भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये 'एक देश, एक निवडणुकी'च्या आश्र्वासनाचा समावेश होता. शिवाय, 'रालोआ ३.०' सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या लक्ष्यपूर्तीमध्येही हे धोरण सामील करण्यात आले होते. सरकारने मंगळवारी (१७ सप्टेंबर) १०० दिवस पूर्ण केले असून त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने कोविंद अहवालाला मंजुरी दिली होती.

### नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू अनुकूल

'रालोआ' सरकारमधील प्रमुख दोन घटक पक्ष जनता दल (संयुक्त) आणि तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) यांनी एक देश, एक निवडणूक धोरणाला आधीच पाठिंबा दिला आहे. देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्यामुळे दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात, त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते, त्यामुळे विकासाची गती मंदावते, असा युक्तिवाद भाजपने केला आहे. 'एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७ मध्ये देशाला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे', असे मत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी संप्टेबर महिन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मांडले.

## संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश गरजेचा

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. दौंड मधील 'आम्ही भारताचे लोक' ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज ७५ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य – अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोक्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

## सर्वात जलद १००० कोटी, 'पुष्पाभाऊं'समोर सर्व फेल!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'पुष्पा २'च्या वादळात टिकून राहणे केवळ अवघडच नाही, तर आता अशक्य होऊ लागले आहे. अल्लू अर्जुनच्या या चित्रपटाने अवघ्या ६ दिवसांत जगभरात १००० कोटींची कमाई केली. यासह 'पुष्पा २' हा सर्वात जलद १००० कोटींची कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. माहित नाही असे किती चित्रपट आहेत, ज्यांनी अल्लू अर्जुनसमोर एका आठवड्यात गटांगळ्या खाल्ल्या. पहिल्या ७ आठवड्यात चित्रपटाने किती कमाई केली? हे जाणून घेऊया. रिपोर्टनुसार, अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' ने सातव्या दिवशी भारतातून ४२ कोटींचा व्यवसाय केला आहे. जिथे तेलगूमधून ९ कोटी रुपये, हिंदीतून ३० कोटी रुपये, तामिळमधून २ कोटी रुपये आणि कन्नड–मल्याळममधून ०.६ आणि ०.४ कोटी रुपये जमा झाले आहेत. यासह, भारतातील 'पुष्पा २' चे एकूण निव्वळ कलेक्शन आतापर्यंत ६८७ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. लवकरच हा चित्रपट ७०० कोटींच्या क्लबमध्ये दाखल होणार आहे.

'पुष्पा २' ४ डिसेंबर रोजी सशुल्क पूर्वावलोकनाने सुरू झाला. या सशुल्क पूर्वावलोकनातून चित्रपटाने १०.६५ कोटी रुपयांची कमाई केली होती. पहिल्या दिवशी भारतातून एकूण १६४.२५ कोटी रुपयांचा व्यवसाय झाला. दुसऱ्या दिवशीची कमाई ९३.८ कोटी रुपये होती. याशिवाय तिसऱ्या दिवशी ११९.२५ कोटी रुपये आणि चौथ्या दिवशी १४१.०५ कोटी रुपये छापण्यात आले. वीकेंडनंतर सोमवारी या चित्रपटाने भारतातून ६४.४५ कोटींचा व्यवसाय केला. त्याच वेळी, मंगळवारी ५१.५५ कोटी रुपयांची कमाई झाली. आता सातव्या दिवशी चित्रपटाची कमाई ४२ कोटींवर पोहोचली आहे.

# डोणगाव मध्ये अवैध धंदे कुणाच्या आशीर्वादाने?

दैनिक आपला विदर्भ

अनेकांची संसार उघड्यावर

अवैधधंदे करणारांचे व संबंधीत विभागाचे साटेलोटे : नागरिकांचा आरोप

वरिष्ठांनी लक्ष देण्याची होत आहे मागणी

### डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंदे भाग २

**डोणगाव/प्रतिनिधी :** मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून डोणगावची ओळख आहे.डोणगाव हे परिसरातील तब्बल तीस ते बत्तीस खेड्याचे व्यावसायिक केंद्रबिंदू आहे. डोणगाव येथे आठवडी बाजार भरत परिसरातील तब्बल तीस ते बत्तीस गावातील नागरिक आपले दैनंदिन व्यवहार या ठिकाणाहून पूर्ण करतात. बाजाराचे गाव व रस्त्यावरील प्रमुख शहर वजा गाव असल्याने डोणगाव परिसरात प्रचंड प्रमाणात व्यावसायिक वाढ होत आहे. या व्यवसायाबरोबरच आता डोणगाव शहराला शहरात अवैध धंदे करणाऱ्यांनी बिळाच्या बाहेर तोंड काढले असल्याने डोणगाव परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत. याकडे मात्र, दारूबंदी विभाग, पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने अवैध धंदे करणाऱ्यांना रान मोकळे मिळत आहे. पोलीस प्रशासनाच्या भ्रष्ट व अर्थपूर्ण संबंधामुळे मात्र गोरगरीबांचे संसार उघड्यावर येत आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन या अवैध धंदे करणार्यांना आवर घालावा, अशी मागणी सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मेहकर तालुक्यातील सर्वात मोठे ग्रामपंचायत व छत्रपती संभाजीनगर नागपूर हायवेवर असलेल्या डोणगाव शहराचा व्यावसायिक दृष्ट्या मोठ्या प्रमाणात महत्व आले आहे. डोणगाव हे



परिसरातील तब्बल तीस ते बत्तीस खेड्यातील खेड्यांची बाजारपेठ आहे. या ठिकाणी कृषी व्यवसायासह इतर व्यवसाय ही झपाट्याने वाढत आहेत. या व्यवसायाबरोबरच डोणगाव परिसरात रित्या दारूविक्री, वरली, जुगार यासह इतर अनेक अवैध व्यवसायाने मात्र गत काही दिवसांपासून डोकेवर काढले आहे. या अवैध व्यवसाय करणाऱ्यांची नागी ठेचण्याचे बळ असलेल्या पोलीस विभागाने मात्र आपली नागी त्यांच्यासमोर टाकल्याने हे अवैध धंदे करणारे कोणालाही जुमानत नसल्याचे दिसून येत आहे.

याबाबतही चर्चेल उधाण आले आहे. डोणगाव परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध मार्गातून संबंधीत विभागाचे अधिकारी कर्मचारी माया मिळत गब्बर होत असल्याचे दिसून येत आहे. पोलिस प्रशासनाच्या आशीर्वादाने डोणगावसह परिसरातील मोठ्या गावात व अडवळणाच्या गावात वरलीमटका, जुगार आदी अवैध धंदे खुलेआम सुरू असून याकडे संबंधीत विभाग दुर्लक्ष करीत असल्याने अवैध धंदे करणार्यांना राण मोकळे मिळत आहे. याकडे वरिष्ठ अधिकारी व कर्मचार्यांनी लक्ष देऊन या अवैध धंद्यांना आळा घालावा, हे अवैध धंदे करणार्यांवर कठोर कारवाई करून डोणगाव परिसरातील अवैध धंदे मुळासह उखडून काढावे, अशी मागणी सुज्ञ नागरिकांसह महिलांकडून होत आहे.

### अवैधधंदे करणाऱ्यांना संबंधीत विभागाचे पाठबळ

डोणगाव परिसरात तब्बल तीस ते बत्तीस गावे येत असून या गावांचे मुख्य केंद्र हे डोणगाव आहे. डोणगाव परिसरात खुलेआम सुरू असलेले अवैध धंदे करण्यासाठी संबंधीत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे पाठबळ असल्याची माहिती आहे. त्यामुळे संबंधीत विभागाने आपल्या विभागाला पोखरणार्या कीड्यांना शोधून काढून त्यांचा बंदोबस्त करावा, यासह संबंधीत अवैध धंदे करणार्यांवर कायद्याचा बगडा उगारून सबक शिकवावा, अशी मागणी महिलांकडून व्यक्त केली जात आहे.

## 'दिलखुलास' 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. सदानंद मोरे यांची विशेष मुलाखत

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' देण्याचा केंद्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला. त्याअनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात या विषयावर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे यांच्या विशेष मुलाखतींचे प्रसारण होणार आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. ही बाब विचारात घेवून केंद्र सरकारने मराठी भाषेला 'अभिजात मराठी भाषेचा दर्जा' देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. केंद्र सरकारच्या या निर्णयाने मराठी भाषा सातासमुद्रापार जगभरात आणखी जास्त वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचणार आहे. मराठी भाषेला मोठा इतिहास आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास, समृद्ध सांस्कृतिक वैभवाची जगभरात ओळख असून ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असणार आहे. याचबरोबर मराठी भाषेच्या बोलींचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळणार असून, संशोधन आणि साहित्यसंग्रह करण्याच्या दृष्टीने चालना मिळणार आहे. त्याअनुषंगाने अभिजात भाषेचा दर्जा? आणि अभिजात दर्जा बहाल केल्यास मराठी भाषेत नेमके काय बदल होणार आहे आणि मराठी भाषेचा इतिहास काय आहे या विषयी 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून डॉ. सदानंद मोरे यांनी माहिती दिली आहे.

'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. सदानंद मोरे यांची मुलाखत दोन भागात प्रसारित होणार आहे. या मुलाखतीचा पहिला भाग मंगळवार दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी तर दुसऱ्या भागाचे मंगळवार दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारण होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या



समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ही मुलाखत ऐकता येणार आहे. तर 'दिलखुलास'कार्यक्रमातून ही मुलाखत शनिवार दि. १४, सोमवार दि. १६, मंगळवार दि. १७ बुधवार दि. १८ आणि गुरूवार दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर'या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. ज्येष्ठ निवेदक दिपक वेलणकर यांनी ही मुलाखत घेतली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली दौऱ्यात पाच निरनिराळ्या मूर्ती देऊन घडविले महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन!



नवी दिल्ली, १२ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर बुधवारी आणि गुरुवारी दिल्ली दौऱ्यावर होते. काल आणि आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी एकूण ७ नेत्यांच्या भेटी घेतल्या. या भेटीदरम्यान त्यांनी ५ निरनिराळ्या मूर्ती भेट देऊन महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना विठ्ठल–रुक्मिणीची मूर्ती भेट दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना छत्रपती शिवरायांची अश्र्वारुढ मूर्ती भेट दिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना वीर सावरकरांची मूर्ती भेट दिली. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांना गाय–वासरुची मूर्ती भेट दिली. तसेच केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना सिद्धीविनायकाची मूर्ती भेट दिली.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा यांच्या भेटीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या विकासासाठी विविध योजनांवर चर्चा केली.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### शिवसेनेची मुंबई महानगर परिसरातील आमदार, खासदार आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न






दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : शिवसेनेची मुंबई महानगर परिसरातील आमदार, खासदार आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आज रामटेक बंगल्यावर पार पडली. यावेळी शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवसेना नेते रामदास कदम यांनी त्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विधानसभा निवडणुकीत दैदिप्यमान यश मिळवल्याबद्दल पक्ष्याच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

### साई मंदिरात आजपासुन हार तुरे फुले नेता येणार; सुजय विखेंनी वाहिली फुले



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी** : मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार आज गुरुवार दिनांक १२ डिसेंबर २०२४ पासून श्री साईबाबा समाधी मंदिरात फुल -हार प्रसाद सुरू झाले. आज मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन हार फुले अर्पण केली. यावेळी श्री साईबाबा संस्थानचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर, प्र. उप मुख्य कार्यकारी अधिकारी संदीपकुमार भोसले, प्रशासकिय अधिकारी प्रज्ञा महांडुळे, मंदिर विभाग प्रमुख विष्णु थोरात आदीउपस्थितहोते.

### महापालिकेत मोठा भ्रष्टाचार, सर्व विभागाची चौकशी करावी : माजी मंत्री आ. एकनाथ खडसे यांची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : गिरणा पंपिंग परिसरात पाईपलाईन चोरी प्रकरणात माजी विरोधी पक्षनेता सुनील महाजन यांचे नाव समोर आले आहेत, तसेच मनपात दोन दिवसांपूर्वी लाच घेणाऱ्या एका अधिकाऱ्याला देखील अटक केली आहे, त्यांच्या सांगण्यानुसार आयुक्त यांना देखील पैसे द्यावे लागते, त्यामुळे त्यांची देखील चौकशी करण्यात आली. त्यामुळे जळगावला महानगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये चौकशी केली असता मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि घोळ समोर येईल, महापालिकेतील सर्व विभागांची कसून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार एकनाथ खडसे यांनी केली आहे. शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

### दूध दरावरुन शेतकरी संघटना आक्रमक, २३ डिसेंबरपासून दूध बंद आंदोलन करण्याचा इशारा

**सातारा/प्रतिनिधी** :जिल्ह्यात दूध दरवाढीसाठी शेतकरी संघटना आक्रमक झालेल्या असून २३ डिसेंबरपासून दूध बंद आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. गाईच्या दुधाला २७ ते २८ रुपये दर मिळत असून म्हशीच्या दुधीला ४७ रुपये दर मिळत आहे. बाजारपेठेतील दुधाच्या दराची किंमत पहिली असता ती दुप्पट आहे. शेतकऱ्यांना खूप कमी दर मिळत असल्याकारणाने त्यांचा खर्च सुद्धा भागत नाही. सातारा जिल्ह्यातील सर्वच शेतकरी नाराज असल्याने दुधाला दर वाढ मिळणार नाही तो पर्यंत सर्व शेतकरी २३ डिसेंबर नंतर दूध संकलन केंद्रावर दूध घालणार नाहीत. तसेच इतर जिल्ह्यातून होणारी दुधाची वाहतूक ही सुद्धा सातारा जिल्ह्यातून होऊन न देण्याचा इशारा शेतकरी संघटनेचे प्रमोद जगदाळे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

# चांदवड तालुक्यातील निमोण येथे दिवसा घरफोडी करुन चोरी करणाऱ्या संशयीतास पोलीसांकडून मुद्देमालासह अटक

दैनिक आपला विदर्भ






**नाशिक/प्रतिनिधी** : चांदवड तालुक्यातील निमोण येथे निवृत्ती पांडूरंग उगले यांच्या घरातून अज्ञात आरोपीने रोख अकरा हजार व सोने चांदीचे दागिने असा एकूण पाच लाख ९६ हजाराची चोरी केली होती. चांदवड पोलीसांनी सदर घटनेचा शिताफीने तपास करुन संशयीतास मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे. याबाबत अपर पोलीस अधिक्षक निकेत भारती यांनी पत्रकार परिषद घेऊन चांदवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक सिध्देश्र्वर आखेगावकर व पोलीस कर्मचाऱ्यांनी तपास यंत्रणा राबविल्याबद्दल त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

दि. ०३ डिसेंबर २०२४ रोजी चांदवड तालुक्यातील निमोण गावातील निवृत्ती पांडूरंग उगले यांचे राहते घरातून सकाळी १०-३० वाजता ते सायंकाळी पाच वाजेचे दरम्यान घरात ठेवलेले सोने व चांदीचे दागिने घरफोडी चोरी करुन चोरु नेल्याबाबत निवृत्ती पांडूरंग उगले रा. निमोण यांनी दिलेल्या तक्रारीवरुन चांदवड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला होता. याबाबत नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधिक्षक अनिकेत भारती व उपविभागीय पोलीस अधिकारी मनमाड उपविभाग बाजीराव महाजन यांनी गुन्ह्याचा आढावा घेवुन दाखल गुन्हा उघडकीस आण्याबाबत केलेल्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणो चांदवडचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांना गुन्ह्याचे तपास कामी वरिष्ठांनी दिलेल्या योग्य त्या सुचनांप्रमाणो त्यांनी चांदवड पोलीस ठाणे कडील तपास पथक तपासकामी रवाना केले.

तपास चालु असतांना फिर्यादी यांच्याकडे केलेली विचारपुस, साक्षीदारांचे घेतलेले जाब- जबाब त्याच प्रमाणो तपासणी केलेले सी.सी. टी.व्ही.फुटेज, त्यांचे तांत्रिक विश्र्लेषण, याप्रकारे झालेल्या तपासातुन आणि मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे गुन्ह्यातील आरोपी हा निमोण गावातील असलेबाबत माहिती मिळाल्याने दि. ०९/१२/२०२४ रोजी सदर इसमांचे राहते घरी जावुन त्यांस ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारता त्याने त्याचे नाव संजय वाल्मिक उगले वय -४० वर्षे रा.निमोण ता. चांदवड असे सांगितले.

त्याच्याकडे सदर गुन्ह्याचे अनुषंगाने केलेली सखोल विचारपुस व त्याने दिलेली गुन्ह्याची कबुली यावरु न त्याने घरफोडी चोरी केलेले खालील वर्णनाचे सोने चांदीचे दागीने काढुन दिले असुन खालील वर्णनाचा मुद्देमाल हा तपासकामी जप्त करण्यात आला आहे. त्यात २०,०००/-रु . एक ०५ ग्रॅम वजनाची सोन्याची ठुशी , ८०,०००/-रु . एक ०२ तोळे वजनाचा सोन्याचा नेकलेस, १,००,०००/-रु . एक ०.३ तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ , ४०.०००/-रु . एक तोळे वजनाच्या ०२ सोन्याच्या अंगठ्या प्रत्येकी ०५ ग्रॅम वजनाच्या, १,४०,०००/-रु . एक ०३ तोळे वजनाची मंगल पोत , १,२०,०००/- रु . एक २.५ तोळे वजनाचे सोन्याचे गाठले, ४०,०००/-रु . सोन्याचे पिळयाचे वेढे ०३ नग, ४०,०००/-रु . ०१ तोळे वजनाचे सोने त्यामध्ये छोटया मुलाच्या अंगठया ०२ नग, ०२ सोन्याचे मणी, सोन्याचे छोटे ओम पान, कानातले कुडके १४ नग , ५.०००/- चांदीचा छल्ला व चांदीची एका पायातील तोरडी, ११,०००/- रु . रोख रक्कम ११.०००/- रु पये. त्यामध्ये ५०० व २०० रु पये दराच्या नोटा असा एकूण ५,९६,०००/-रुपयाचा माल ताब्यात घेतला.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधिक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधिक्षक अनिकेत भारती व उपविभागीय पोलीस अधिकारी मनमाड उपविभाग बाजीराव महाजन यांनी दाखल गुन्हा उघडकीस आणल्याबाबत केलेल्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणो चांदवड पोलीस ठाणोचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ, सपोनि एस.एच. आखेगावकर, पोहवा गुळे, पोहवा जाधव, चांदवड पोलीस ठाणो कडील गुन्हे शोध पथकातील पोना जाधव, पोशि बस्ते, पोशि शेळके यांचे पथकाने वरील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणणोची कामगिरी केली आहे.या संदर्भात मालेगावचे अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती यांनी आधिक माहिती दिली.

## रब्बी हंगामातील प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्य शासनामार्फत रब्बी हंगामामध्ये देखील शेतकऱ्यांना एक रूपयात पीक विमा योजना लागू केली आहे. तरी शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आपल्या रब्बी हंगामातील गहू, हरभरा, कांदा पिकाचा विमा उतरवावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर आहे. राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना २०१६-१७ पासून राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२३ पासून महाराष्ट्र शासनामार्फत एक रूपयात पीक विमा योजना लागू केली आहे. याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला आहे. चालू रब्बी हंगाम २०२४-२५ मध्ये योजनेचा लाभ घेण्यासाठी केंद्र सरकारच्या पीक विमा पोर्टल www.pmfby.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. महाराष्ट्रात रब्बी हंगामातील गहू, हरभरा तसेच रब्बी कांदा पिकासाठी भाग घेण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर २०२४ आहे. तर उन्हाळी भात व उन्हाळी भुईमुग या पिकांसाठी ही मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत आहे. गतवर्षी रब्बी हंगाम २०२३-२४ मध्ये विमा योजनेत साधारणता ७१ लाख विमा अर्ज प्राप्त झाले होते.

## माजी माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांना श्रद्धांजली



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांचे नुकतेच निधन झाले. ते ३१ जानेवारी २०२३ ला उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर येथून निवृत्त झाले होते. आज मंत्रालयात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी श्रद्धांजली वाहिली.

श्रद्धांजली वाहताना संचालक (माहिती) दयानंद कांबळे म्हणाले की, डॉ.खराट यांच्या शासकीय नोकरीची सुरुवात कोल्हापूर येथून झाली होती. रत्नागिरी व ठाणे येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून तर माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई येथे वरिष्ठ सहायक संचालक म्हणून सेवा बजावल्यानंतर १० ऑक्टोबर २०२१ ला उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर येथे तेरुजू झाले होते. डॉ. खराट वाचनप्रेमी, सतत अभ्यासू वृत्ती असलेले आणि उत्कृष्ट संपादन कौशल्य असलेले लेखक म्हणूनही परिचित होते. महात्मा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अभ्यासक होते. ते उत्कृष्ट वाङमय निर्मितीसाठी त्यांना शासनाचे दोन पुरस्कार, उत्कृष्ट पुस्तकासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा पुरस्कार, डॉ. आंबेडकर पुरस्कार, शब्दशिल्प पुरस्कार तसेच चौथा स्तंभ पुरस्कारासह अन्यही पुरस्कार मिळाले होते. त्यांनी अनेक विषयांवर लेखन व माहितीपटांची निर्मिती केली होती.त्यांनी विविध २५ विषयांच्या पुस्तकांचे लिखाण केले असून, त्यांच्या निधनाने एक हरहुन्नरी व्यक्तीमत्व गमावले असल्याचेही संचालक श्री.कांबळे यावेळी म्हणाले.

माहिती व जनसंपर्क विभागातील माजी वरिष्ठ सहायक संचालक प्रकाश डोईफोडे, पुणे जिल्हा माहिती कार्यालय येथील माजी प्रदर्शन सहाय्यक अजित कोकीळ, लातुर जिल्हा माहिती कार्यालयाचे वाहनचालक प्रविण बिदरकर यांचेही नुकतेच निधन झाल्याने यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.

संचालक किशोर गांगुर्डे, उपसंचालक गोविंद अहंकारी, उपसंचालक सीमा रनाळकर, उपसंचालक (लेखा) सुभाष नागप यांच्यासह माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सर्व वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य लॉटरी नोव्हेंबर २०२४ चा भव्य सोडतीचा निकाल जाहीर




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात पाच मासिक तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जातात. नोव्हेंबर २०२४ मध्ये मासिक व भव्यतम सोडतीतून २८,९९२ तिकिटांना ३ कोटी २६ लाख ७० हजार ८५० रुपये व साप्ताहिक सोडतीतून ५६,७४१ तिकीटांना रू. दोन कोटी ३१ लाख ६३ हजार ९०० ची बक्षिस जाहीर झाली आहेत, असे महाराष्ट्र राज्य लॉटरी वाशी येथील वित्त व लेखा विभागाचे उपसंचालक यांनी कळविले आहे.

१ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र सह्याद्री, २ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र तेजस्विनी, ६ नोव्हेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र गणेशलक्ष्मी दिवाळी विशेष, १२ डिसेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र दिवाळी भव्यतम, १९ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र गजराज व दि. २०/११/२०२४ रोजी महाराष्ट्र गौरव या मासिक सोडती दुपारी ४.०० वाजता काढण्यात आल्या आहेत.

या लॉटरी तिकिटांना जाहीर झालेले बक्षीसः-

महाराष्ट्र सहयाद्री मालिका तिकीट क्रमांक MS-2411D/43098 या चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक यांचेकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू. ११ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र गणेशलक्ष्मी दिवाळी विशेष मालिका तिकीट क्रमांक GS-06-3862 या महाराजा लॉटरी सेंटर, इचलकरंजी यांचेकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू. २२ लाखाचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र दिवाळी भव्यतम सोडत तिकीट क्रमांक DI-05 / 38465 या न्यू जय अंबे लॉटरी भंडार, यवतमाळ यांचेकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू. एक कोटीचे प्रथम क्रमांकाचे एक बक्षिस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र गजराज तिकीट क्रमांक GJ 24/7136 या न्यू जय अंबे लॉटरी भंडार, यवतमाळ यांच्याकडून विक्री झालेल्या तिकीटास रक्कम रू.१४ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र गौरव तिकिट क्रमांक G13/5771 या भारत लॉटरी, कोल्हापूर यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रक्कम रु.३५ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस जाहिर झाले आहे.

महा. सागरलक्ष्मी ते महाराष्ट्रलक्ष्मी या साप्ताहिक सोडतीमधून रक्कम रू. सात लाखाचे प्रथम क्रमांकाचे एकूण १० बक्षिसे जाहीर झाली आहेत.

सर्व खरेदीदारांनी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या वेबसाईटवर नमूद प्रक्रिया पूर्ण करून रक्कम. दहा हजारावरील वरील बक्षिसाची मागणी या कार्यालयाकडे सादर करावी. रक्कम रू. दहा हजाराच्या आतील बक्षिस रकमेची मागणी विक्रेत्यांकडून करण्यात यावी, असे महाराष्ट्र राज्य लॉटरी वाशी येथील वित्त व लेखा विभागाचे उपसंचालक यांनी कळविले आहे.

# मालमत्ता कर वसुलीसाठी भिवंडी महापालिका आठवडाभर राबवणार अभय योजना

दैनिक आपला विदर्भ




**भिवंडी/प्रतिनिधी** : लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या कामात असंख्य कर्मचारी गुंतून पडल्याने भिवंडी महापालिकेच्या मालमत्ता कर वसुलीवर परिणाम झाला होता. मालमत्ता कर वसुली अधिक जोमाने व्हावी याकरिता दिनांक १२ ते १७ डिसेंबर या आठवड्याच्या कालावधीसाठी तिसऱ्यांदा अभय योजना राबविण्यात येत असल्याची माहिती महापालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिले आहे.

या अभय योजनेत थकीत मालमत्ता कर भरणाऱ्यास १०० टक्के व्याजमाफी असणार असून या योजनेचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेऊन आपल्या थकीत मालमत्ता करांचा भरणा करावा असे आवाहन आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे. १४ डिसेंबरला राष्ट्रीय लोकअदालत लावली आहे त्यामध्ये १० हजार पेक्षा जास्त मालमत्ता धारकांना नोटीस बजावण्यात आली आहे. आतापर्यंत मालमत्ता करातून ३० कोटी रुपये वसूल झाले आहेत.

जे वारंवार नोटीस देऊन कर भरत नाहीत त्यांच्यावर कारवाई म्हणून ११५ मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर भिवंडीतील रुग्णालयांची यादी करण्यात आली आहे, त्यांनी व्यवसायिक दराने मालमत्ता कर भरला आहे की नाही याची पाहणी सुरु केली आहे. येणाऱ्या दोन वर्षात भिवंडी महापालिकेची मालमत्ता कराची वसुली २५० कोटी पेक्षा जास्त होईल याची मला खात्री वाटते त्यासाठी सर्व नियोजन सुरु असल्याची माहिती भिवंडी महानगरपालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिली आहे.

# जिल्ह्यात सुशासन सप्ताह राबविण्यात येणार

## १९ ते २४ डिसेंबर दरम्यान 'प्रशासन गाँव की ओर' मोहीम

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी** : केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहांतर्गत 'प्रशासन गाँव की ओर' मोहीम राबविण्यात येणार असून त्यानुषंगाने जिल्हा प्रशासनाने तयारी सुरु केली आहे.

या मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी प्र.जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी बैठक घेण्यात आली. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी राजेंद्र पौळ, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसिलदार संजय गांधी, विविध विभागाचे प्रमुख व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या 'सुशासन सप्ताह-प्रशासन गाँव की ओर' मोहिमेंतर्गत प्रशासनातील विविध विभागांच्या सेवांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने प्र.जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांनी प्रशासनाला तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी आराखडा तयार करावा. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांतर्गत लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारुन घ्यावे. प्रलंबित तक्रारींचा निपटारा करुन घ्यावा. या मोहिमेला विशेष प्राधान्य देवून नियोजन करावे, असे निर्देश श्री. शेलार यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

केंद्र शासनाची ही महत्त्वाकांक्षी मोहीम जिल्ह्यात यशस्वीपणे राबवायची आहे. या मोहिमेदरम्यान विभागांनी अभिनव उपक्रम राबवावेत. विभाग प्रमुखांनी अधिनस्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे यांनी दिले.

'सुशासन सप्ताह- प्रशासन गाँव की ओर' मोहिमेच्या अंमलबजावणीसंदर्भात २३ डिसेंबर रोजी कार्यशाळा आयोजित केली जाणार आहे. या मोहिमेंतर्गत गावपातळीवर शिबिरे आयोजित करुन विविध सेवांचा लाभ दिला जाणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या तक्रारीं, अर्जांचा निपटारा करुन सेवांचा लाभ दिला जाणार आहे., अशी माहिती याबैठकीत देण्यात आली.

## समाजकंठकावर तात्काळ देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून फाशीची शिक्षा द्या

भीम तायगर सेना, शाखा उमरखेड शहर व तालुका यवतमाळ जिल्हा यांची निवेदन देत मागणी




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** : परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची माथेफिरूने तोडफोड केल्यानंतर वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेच्या निषेधार्थ

भिम टायगर सेना,शाखा उमरखेड शहर व तालुका सामाजीक संघटने कडुन महाराष्ट्रातील परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर याच्या पुतळ्या समोरील भारतीय संविधान पुस्तकाची नासधूस व तोडफोड करणाऱ्या समाज कंठकावर सदर प्रकरण फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालवून लवकरात लवकर निकाल देवुन या समाज कंठकावर देशद्रोहचा गुन्हा दाखल करून तात्काळ फाशीची शिक्षा देण्याचे निवेदन उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यवतमाळ यांना देण्यात आले. यावेळी शामा धुळे, करण भरणे,कैलास कदम, सिद्धार्थ दिवेकर, नितीन कांबळे, आयुब पठाण, साहिद,संदीप विणकरे, तुषार धुळे,परमेश्र्वर बडेराव, भीमराव सोनुले,चंदू वाठोरे,सुनील सोनटक्के व समस्त संविधान प्रेमी व आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.

## राज्यपालांच्या उपस्थितीत गीता जयंती महोत्सव उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील कांदिवली येथे बुधवारी सायंकाळी गीता जयंती महोत्सव साजरा झाला. 'भगवद्गीता' एक कालातीत मार्गदर्शक ग्रंथ असून आजही अत्यंत समर्पक आहे. भगवद्गीता आपल्याला जगणे शिकविते, असे प्रतिपादन राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी केले.

पोईसर जिमखाना आणि इस्कॉन जुहू यांच्यामार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार आशिष शेलार, आमदार मनीषा चौधरी, आमदार संजय उपाध्याय, माजी खासदार गोपाळ शेट्टी, भगवद्गीता शिक्षा अभियान समितीचे अध्यक्ष डॉ. योगेश दुबे, जुहू इस्कॉनचे अध्यक्ष श्री. ब्रज हरी दास, पोईसर जिमखानाचे अध्यक्ष मुकेश भंडारी, अमेरिकेच्या टेक्सासचे अटॉर्नी जनरल कॅन टॅक्सन आदी यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, भगवद्गीता हा भारतातील ज्ञान आणि बुद्धीचा उत्कृष्ट ग्रंथ आहे. प्रत्येकाने स्वच्छ मनाने आणि फळाची चिंता न करता एकाग्रतेने आपले कर्तव्य करत रहावे, यशाच्या रूपाने फळ आपोआप मिळेल, असे गीता शिकविते.

समाजातील प्रत्येकाला शिक्षण, आरोग्य, निवास आदी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेने गरजूंना या किमान सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी पुढाकार घेऊन इतर देशांसमोर आदर्श निर्माण करावा, आपणही यासाठी सहकार्य करू, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जगातील सर्व प्रगत देशांनी यासाठी प्रयत्न केल्यास चांगली समाज निर्मिती होऊन मानवाचा हॅपिनेस इंडेक्स वाढेल, असा विश्र्वास राज्यपाल श्री. राधाकृष्णन यावेळी व्यक्त केला.

## परभणीकरांनी संयम बाळगावा; रासपचे अध्यक्ष महादेव जानकरांचे आवाहन




दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी** :- भारताचे संविधान हा आपला आत्मा आहे, जे काल झाले त्यावर प्रशासनाने योग्य ती दखल घेतली आहे. जे नुकसान झाले त्यासंदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो, त्याचे पंचनामे व्यवस्थित होत आहेत. अशा घटना पुन्हा घडल्या नाही पाहिजे . हा महाराष्ट्र पुरोगामी महाराष्ट्र आहे, जी गोष्ट घडली तिचं कोणीही समर्थन करत नाही, जनतेने गुण्या गोविंदाने राहावे व्यापाऱ्यांना माझी विनंती आहे की जे काही नुकसान झाले आहे त्यात प्रशासकीय माध्यमातून मदत केली जाईल त्यांनी आपला बेमुदत बंद मागे घ्यावा वन नेशन वन इलेक्शनचा निर्णय चांगला आहे कारण आचारसंहितेच्या काळामध्ये बरेच दिवस आपल्याला कामं करता येत नाहीत त्यामुळे ते झाले पाहिजे.

## लवाद नामतालिका तयार करण्यासाठी इच्छूक व्यक्तींकडून अर्ज आमंत्रित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियमातील कलमानुसार सन २०२५ से २०२८ या कालावधीसाठी लवाद नामतालिका तयार करण्यासाठी इच्छूक व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात आले असून पात्र व्यक्तींनी १६ जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी केले आहे.

पात्र व्यक्तींमध्ये सर्व न्यायालयातील निवृत्त व सेवानिवृत्त विधी अधिकारी, प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस, चार्टर्ड अकाऊन्टंट, कास्ट अकाऊन्टंट, राष्ट्रीय बँका, ग्रामिण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी, सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी अर्ज सादर करु शकणार आहेत. तसेच अशा व्यक्तींची नियुक्ती करतांना उक्त अधिनियमामध्ये नमुद नसलेले तरी खालील प्रमाणे जादा अर्हता किंवा पात्रता असाव्यात. त्यांचेवर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नसावे. शासकीय किंवा बँक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा. अशी व्यक्ती कोणत्याही काळ्या यादीत मध्ये समाविष्ठ नसावा. सदर व्यक्ती संबंधित विभागाच्या विभागीय सहकारी सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या जिल्ह्यातील रहिवासी असावा. सदर व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करु शकते.

अर्जाचे विहित नमुने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती कार्यालयाचा पत्ता- सहकार संकुल कांता नगर, जुना बायपास रोड, महसुल भवन कार्यालय समोर, अमरावती यांचे कार्यालयात दिनांक १७ डिसेंबर २०२४ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. अर्ज सादर करणेची अंतिम मुदत दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत राहिल तसेच प्राप्त अर्जाची छाननी पूर्ण करुन दि १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रारुप लवाद नामतालीका प्रसिध्द होईल. सदर प्रारुप नामतालिका यादी संबंधित विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती या कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामतालिकेवर हरकती असल्यास vaidhanik8gmail.com या ई-मेल वर पुराव्यासह हरकती दि २१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर कराव्यात. हरकतीचा निर्णय दि.११ मार्च २०२५ रोजी करुन दि. १८ मार्च २०२५ रोजी अंतिम लवाद नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल. या बाबतची जाहीर सूचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे, असे आवाहन विभागीय सहनिबंधक शंकर कुंभार , सहकारी संस्था, अमरावती यांनी केले आहे.

## करंजी येथे अवैध वाळू वाहतूक करणारा टिप्पर पकडला

### मंडळ अधिकारी गजानन सुरोशे यांची उत्तम कामगिरी

दैनिक आपला विदर्भ



**उमरखेड/प्रतिनिधी** : उमरखेड तालुक्यातील गांजेगाव पैनगंगा नदी पात्रातून दिवस रात्र मोठ्या प्रमाणात अवैध वाळू चोरी जोमात चालते. यावर नियंत्रण करण्याची जबाबदारी तलाठ्यापासून तहसीलदार, मंडळ अधिकारी,उपविभागीय अधिकारी, खनिकर्म अधिकारी व पोलीस प्रशासन या सर्वांची असते,मात्र पाहिजे त्या प्रमाणात कार्यवाई केली जात नाही.

पण महसूल भागात मंडळ अधिकारी गजानन सुरोशे यांना सोडून आपले कर्तव्य बजावताना इतर कोणी दिसत नाही?गजानन सुरोशे यांनी प्रत्येक वेळेस अवैध वाळू चोरी करणाऱ्यावर लगाम कसली आहे. याचेच एक उदहारण बुधवारी रात्री बिटरगाव( बू )मंडळ चे मंडळ अधिकारी गजानन सूरोशे यांना अवैधपणे वाळूची चोरी होत असल्याची माहिती मिळताच त्यांनी साफळा रचुन फुलसावंगी भागातून करंजी येथे अवैध वाळू ची वाहतूक करत असताना १२ डिसेंबर रात्री १० वाजताच्या दरम्यान करंजी येथे एक संशयित टिप्पर क्रमांक MH -04 CU 0698 अवैध वाळू वाहतूक करताना आढळून आला. या वाळू वाहतुकीसंबंधी महसूल विभागाने तपासणी केली असता ड्रायव्हरकडे कुठलाही पास रॉयल्टी आढळून आली नाही. त्यामुळे टिप्पर मध्ये असलेली वाळू चोरीची असल्याची शहानिशा केल्यानंतर वाळू सहित टिप्पर महसूल विभागाने कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यासाठी तहसीलदार कार्यालयामध्ये आणून जप्त करण्यात आला.

ही कारवाई उपविभागीय अधिकारी उमरखेड, तहसीलदार उमरखेड,यांच्या मार्गदर्शनात बिटरगाव (बू) मंडळ चे मंडळ अधिकारि गजानन सुरोशे, ग्राम महसूल अधिकारी राजेश भंडारे, पी पि सानप,संतोष जगताप,अक्षय शिंदे,अनिकेत शिरसाट,ग्राम महसूल सेवक वासुदेव जिकूटवार,कल्यान सोळंके,उंदल राठोड व वाहन चालक धम्मदिप कांबळे यांनी करुन वाहन तहसिल कार्यालय उमरखेड येथे पुढील दंडात्मक कार्यवाही करीता लावले आहे.

## विविध वृत्त...

### शिक्षक पात्रता परीक्षेचे आक्षेप नोंदवण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार दि. १० नोव्हेंबर रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा पेपर क्र.१ पेपर क्र.२ ची तात्पुरती उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या परीक्षेसाठी पेपर क्र.१ व पेपर क्र.२ बाबत प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी व आक्षेप असल्यास ते परिषदेच्या http://mahatet.in संकेतस्थळावर दि. १६ डिसेंबर अखेरपर्यंत पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या आक्षेप व त्रुटीबाबतचे निवेदन http://mahatet.in या संकेतस्थळावर परीक्षार्थ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आक्षेप नोंदणी या लिंकव्दारे परिषदेकडे पाठवता येतील.

आक्षेपाबाबत लेखी निवेदन समक्ष, टपालाने किंवा ईमेलव्दारे पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही. विहित मुदतीत ऑनलाईनरित्या प्राप्त झालेल्या आक्षेपाचा विचार करुन विषय तज्ञांच्या अभिप्रायानुसार अंतिम उत्तरसुची यथवकाश प्रसिध्द करण्यात येईल. याची उमदेवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्ष परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.


### चिखलीतील शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी पद्वारे शेतातील पिकाची नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : कृषी विभागाच्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात यंदाच्या रब्बी हंगामापासून ई-पिक पाहणी (डिजीटल क्रॉप सर्वे) या मोबाईल पव्दारे शेतकरी स्तरावरुन पिकाची नोंदणी दि. १ डिसेंबरपासून सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे चिखली तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवानी ई-पिक पाहणी मोबाईल ॲपच्या माध्यमातून प्रत्यक्ष शेतावर जाऊन आपल्या पिकांची नोंदणी करावी, असे आवाहन तहसिलदारांनी केले आहे.

डिजीटल क्रॉप सर्वे हा गटाच्या हद्दीवर आधारित बंधनकारक करण्यात आली आहे. जोपर्यंत संबंधित खातेदार निवडलेल्या गटात जाऊन पिक पाहणी करत नाही,तोपर्यंत पिकाचे छायाचित्र काढता येत नाही व पिक पाहणी अपलोड करता येत नाही. चिखली तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवानी ई-पिक पाहणी डीजीटल क्रॉप सर्वे ॲपच्या माध्यमातून प्रत्यक्ष शेतावर जाऊन आपल्या पिकांची नोंदणी करावी, असे आवाहन चिखलीचे तहसिलदार मुरलीधर गायकवाड यांनी केले आहे.

### नागपूर पोलिसांनी एका व्यापाऱ्याचे अपहरण करण्याच्या तयारीत असणाऱ्या टोळीला केले जेरबंद



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : नागपुरातील हुडकेश्र्वर पोलिसांनी एका अपहरण करणाऱ्या टोळीला जेरबंद केलं आहे. ही टोळी नागपुरातील एका व्यापाराचे अपहरण करणार होती. त्या आगोदरच पोलिसांनी या टोळीतील चार आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या टोळी कडून एक पिस्तूल ,६ जिवंत काडतुसे, तलवार, चाकू आणि मोबाईल जप्त करण्यात आले आहे. नागपुरातील रहिवासी अनिल सरजारे यांनी मध्यप्रदेशच्या रिवा मध्ये राहणारा क्षत्रदेव सिंग याला फोन करून सांगितले की नागपुरातील एका व्यापऱ्याचे अपहरण करायचे आहे आणि त्याला नागपुरला बोलावले. क्षत्रदेव सबोत त्याचा मित्र अतुल वर्मा नागपुरात पोहचला, वर्माने या अगोदर मध्यप्रदेश मध्ये अपहरण करून हत्या केली होती ज्यामध्ये तो सध्या जमीनावर सुटला आहे. या तीनही आरोपींनी अमोल वालदे आणि रोहित घोषला सोबत घेतलं, ज्या व्यापारीचे अपहरण करायचं होतं त्याच्या हे घरा समोर वाट पाहत होते. तेवढ्यात तिथे पोलीस पेट्रोलिंग करण्यासाठी पोहचले. पोलिसांना बघताच आरोपीने पळ काढत असताना त्यांची मोटारसायकल पडली आणि पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपींची विचारपूस केली असता पोलिसांना माहिती मिळाली की हे सर्व आरोपी अपहरण करण्यासाठी बसले होते.

### देव्हारी शाळेतील विद्यार्थ्यांची शालेय कागदपत्रे आता जिल्हा परिषद शाळा वरवंड येथे मिळणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत असलेल्या जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा देव्हारी ही शाळा विस्थापित झाल्यामुळे बंद करण्यात आली आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांशी संबंधित सर्व दस्तऐवज, शाळा दुय्यम प्रत व इतर सर्व अभिलेखे हे नजिकची शाळा जि.प. मराठी उच्च मराठी शाळा वरवंड येथे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. विद्यार्थी व पालकानी शाळेशी संबंधित कामासाठी मुख्याध्यापक जिल्हा परिषद मराठी उच्च शाळा वरवंड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांनी केले आहे.